| Article Date | Headline / Summary | Publication |
|---|---|---|
| 13 Apr 2026 | The excitement of foreign trips and the benefits of insurance | Maharashtra Times |

(चित्र : एआय)


अनिरुद्ध भातखंडे
Aniruddha.b
@timesofindia.com





# फॉरेन ट्रिपची धमाल अन् विम्याची कमाल

**परदेश सहलींचे आकर्षण दिवसेंदिवस वाढत असताना जोखमींची जाणीवही तितकीच महत्त्वाची ठरते. अचानक उद्भवणाऱ्या वैद्यकीय अडचणी, सहल रद्द होणे किंवा सामान हरवणे यामुळे आनंदावर विरजण येऊ शकते. अशा वेळी प्रवास विमा हा केवळ खर्च नसून, आर्थिक आणि मानसिक सुरक्षिततेचा आधार ठरतो. योग्य नियोजनासोबत योग्य विमा घेतल्यास तुमची सहल खऱ्या अर्थाने निर्धास्त आणि संस्मरणीय बनते.**

'वेगळा प्रवासी विमा घेण्याची गरजच काय? मला काहीही होणार नाही, अजूनही मी चांगला धडधाकट आहे. चांगलं बोलत जा गं,' या शब्दांत सरकारी सेवेतून निवृत्त झालेले ७५ वर्षांचे आनंदराव काळे यांनी मुलगी अश्विनीचा प्रस्ताव धुडकावून लावला. काळे पिता-पुत्री आपल्या आगामी श्रीलंका सहलीची चर्चा आणि प्लॅनिंग करीत होते. 'आमच्या या कौटुंबिक सहलीमध्ये समुद्रसफारी, साहसी खेळ आणि क्रूझचाही समावेश आहे. त्यामुळे प्रवासी विमा घ्यायचा आणि ही सुट्टी एंजॉय करायची, असा माझा विचार आहे,' असे पनवेलमधील खासगी शाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत असणारी अश्विनी सांगत होती.

अश्विनीची भीती अगदीच निराधार नाही. 'दोन वर्षांपूर्वी मलेशियामध्ये पॅरासेलिंग करताना माझ्या दादाचा पाय मोडला. या अपघातामुळे आमच्या सुट्टीची वाट लागली. मलेशियातील वैद्यकीय सेवेचा यापूर्वी आम्ही कसलाही अनुभव घेतला नव्हता आणि आश्चर्याची बाब म्हणजे बाबांच्या हट्टामुळे आम्ही प्रवासी विमाही घेतला नव्हता. भारतात परत येऊन उपचार करण्याचा निर्णय दादाने घेतल्याने सहल अर्धवट सोडून परतण्याशिवाय कोणताही पर्यायच आमच्यासमोर उरला नाही,' अश्विनी सांगत होती. हल्ली दररोज टीव्ही आणि वर्तमानपत्रांतही परदेशी पर्यटनात साहसी खेळांमध्ये झालेली दुर्घटना, हरवलेल्या सामानाबद्दलची सोशल मीडियावरील तक्रार किंवा बॅगेतील सामानाचे झालेले नुकसान आदींबाबत बातम्या वाचायला मिळतात. त्यातच ही जोखीम दूर करणारे महत्त्वाचे साधन असणारा प्रवासी विमा नसेल, तर अनेक गोष्टी अवघड होऊन बसतात आणि सहलीचा फियास्को होतो. सहलीचा सुरुवातीचा खर्च वाचवण्यासाठी आणि अशा घटना काय घडतच असतात, या समजुतीपोटी अनेकदा त्याकडे दुर्लक्ष केले जात असे. मात्र, आता चित्र बदलत आहे. सध्याच्या काळात पर्यटनाची हटकून आवड असणारी 'जेन झी' आणि अगदी 'मिलेनियल्स'नीही जगभरातील परिस्थिती, जागतिक संकटे, संघर्ष, युद्ध आणि सततची अनिश्चितता अनुभवली आहे. केलेला बेत किती लवकर 'फ्लॉप' ठरू शकतो, हे त्यांनीही जवळून अनुभवले आहे. त्यामुळे ते महागडी ट्रिप प्लॅन करण्यापूर्वी पूर्वतयारीवर भर देत आहेत, अशी माहिती 'बजाज जनरल इन्शुरन्स'चे चीफ टेक्निकल ऑफिसर (कमर्शिअल) अमरनाथ सक्सेना यांनी दिली.

## प्रवासी विम्यातील बाबी

प्रवासी विमा अर्थात 'ट्रॅव्हल इन्शुरन्स' निवडणे हे वेळखाऊ आणि डोकेदुखीचे काम ठरू शकते. त्यामुळे त्यातील मूलभूत गोष्टी आधी समजून घेऊ या. मूळातच ट्रॅव्हल इन्शुरन्स तुम्हाला सहलीतील व्यत्ययांमुळे होणाऱ्या आर्थिक आणि लॉजिस्टिक प्रभावापासून वाचवतो. वैद्यकीय आणीबाणी आणि सहल रद्द होण्यापासून ते सामान हरवण्यापर्यंत, कोणतेही संकट असो, तुमच्या सहलीच्या आनंदावर पाणी फेरले जाणार नाही, याची काळजी प्रवासी विमा घेतो. तुम्ही परदेशात प्रवास करत असल्यास तेथे खर्च आणि गुंतागुंत वाढू शकते. अशा वेळी प्रवास विमा महत्त्वाचा ठरू शकतो, असेही सक्सेना यांनी नमूद केले.

> प्रवासातील वैद्यकीय आणीबाणी, उड्डाणांना होणारा विलंब किंवा नैसर्गिक आपत्ती अशा अनपेक्षित संकटांत प्रवासी विमा आर्थिक सुरक्षा देतो. युद्धजन्य परिस्थिती वगळता, तांत्रिक किंवा हवामानातील बदलांमुळे अडकलेल्या प्रवाशांना सात दिवसांपर्यंत मोफत विमा मुदतवाढही मिळते. थोडक्यात, नियंत्रणाबाहेरील परिस्थितीमुळे प्रवासात बदल झाल्यास होणारा आर्थिक भुर्दंड टाळण्यासाठी प्रवासी विमा अत्यंत आवश्यक आहे. अनपेक्षित आर्थिक भुर्दंड टाळून निर्धास्त प्रवासासाठी हा विमा एक अत्यंत महत्त्वाचे आणि जबाबदार साधन ठरते.
>
> – अमरनाथ सक्सेना, चीफ टेक्निकल ऑफिसर (कमर्शिअल), 'बजाज जनरल इन्शुरन्स'


## किमान गरजा

प्रवासी विमा निवडताना साधारणपणे काही महत्त्वाच्या गोष्टींचा विचार केला जातो. त्यामध्ये तुम्ही किती वैद्यकीय संरक्षण निवडता, सहलीचा कालावधी किती आहे, तुमचे वय किती आहे आणि तुमचे ठिकाण नेमके कोणते आहे, या गोष्टी विचारात घेतल्या जातात.


➤ उर्वरित मजकूर... २


## युरोप अन् आग्नेय आशिया

- हल्ली भारतीय पर्यटकांचा मोठ्या प्रमाणावर आग्नेय आशिया आणि युरोपच्या सहलींवर भर आहे. 'थॉमस कुक' आणि 'एसओटीसी इंडिया हॉलिडे रिपोर्ट'च्या अहवालांनुसार विदेशी सहलींसाठी भारतीयांचे सर्वोच्च प्राधान्य युरोपला आहे. एकूण सहलींमध्ये युरोप सहलींचे प्रमाण जवळपास ५० टक्के आहे. त्यापाठोपाठ ४६ टक्क्यांसह आग्नेय आशियाचा दुसरा क्रमांक लागतो. या पार्श्वभूमीवर या दोन्ही प्रदेशांत प्रवास विम्याचे नेमके काय फायदे आहेत, हे समजून घेऊ या...
- युरोपला प्रवास करताना वैद्यकीय किंवा अपघाती जोखीम संरक्षित करण्यासाठी ग्राहकांकडे किमान रकमेचे विमा संरक्षण असणे बंधनकारक आहे.
- व्हिसा अर्जासाठी ही सहसा प्रमुख अटींपैकी एक असते. मात्र, आग्नेय आशियाई देशांमध्ये प्रवास करताना अशी कोणतीही सक्तीची अट नसते.
- युरोपसाठी, विम्याचे संरक्षण शेंगेन (Schengen) व्हिसाच्या आवश्यकतांनुसार किमान विमा रक्कम (३०,००० युरो) असावी लागते.
- आग्नेय आशियासाठी पर्यटक त्यांच्या सहलीच्या स्वरूपानुसार साहसी उपक्रमांसाठी अतिरिक्त संरक्षणाचा विचार करू शकतात.
- अनेक शेंगेन देशांमध्ये व्हिसा प्रक्रियेचा भाग म्हणून किमान वैद्यकीय विम्याचा पुरावा असणे आवश्यक असते.
- त्याचे योग्य नियोजन केले नाही, तर तुमचा व्हिसा अर्ज नाकारला जाण्याची शक्यता असते.
- आग्नेय आशियामध्ये कदाचित युरोपसारखे नियम नसतील; याचा अर्थ तिथे जोखीम कमी आहे असा होत नाही. उलट, काही भागांतील विरळ कनेक्टिव्हिटी आणि आपत्कालीन मदतीसाठी मिळणारे मर्यादित सहकार्य यामुळे तिथेही विमा तितकाच आवश्यक ठरतो.
- फरक फक्त हाच आहे, की युरोपच्या तुलनेत आग्नेय आशियासाठी विमा साधारणपणे खूप कमी खर्चात मिळतो.



# फॉरेन ट्रिपची धमाल अन् विम्याची कमाल

➤ पान १वरून

सुरुवात म्हणून, प्रवाशांनी असा विमा निवडावा ज्यामध्ये वैद्यकीय आणीबाणी, रुग्णालयात दाखल होणे, आपत्कालीन परिस्थितीत बाहेर पडणे, सहल रद्द होणे किंवा मध्येच थांबवणे आणि सामानाचे नुकसान या गोष्टींचा समावेश असेल. काही अनुचित घडल्यास यांवरील खर्चांत मोठ्या प्रमाणात भर पडू शकते. त्याहीपलीकडे जाऊन बारीक गोष्टींनाही महत्त्व असते. संरक्षणाची मर्यादा, दावा करण्याची प्रक्रिया आणि मदतीची उपलब्धता किती लवकर होते, या गोष्टींची अशा आपत्कालीन प्रसंगी मोठी मदत होऊ शकते.

## 'कॅन्सल फॉर एनी रिझन'

प्रवासी विम्यातील 'कोणत्याही कारणास्तव रद्द करा' अर्थात 'कॅन्सल फॉर एनी रिझन' हे फीचर 'कॅन्सलेशन कव्हरेज'च्या पलीकडे जाऊन अधिक लवचीकता प्रदान करते. या सेवेमुळे सामूहिक तर सोडाच अगदी वैयक्तिक कारणांसाठीदेखील सहल रद्द करण्याची मुभा मिळते आणि सहलीच्या खर्चाचा काही हिस्सा परत मिळतो. एका अहवालानुसार, सध्याच्या विलक्षण जागतिक स्थितीमुळे यंदा मार्चच्या सुरुवातीपासूनच 'कॅन्सल फॉर एनी रिझन' या फीचरचा प्रवासी विम्यात अंतर्भाव करण्याचे प्रमाण २७ टक्क्यांनी वाढले आहे. बहुतेक प्रवास विम्यांमध्ये 'कॅन्सल फॉर एनी रिझन'ची सुविधा मिळवण्यासाठी अतिरिक्त शुल्क द्यावे लागते. कोणत्याही सहलीचे बुकिंग केल्यानंतर ठरावीक कालावधीतच ही सुविधा विकत घ्यावी लागते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे प्रवासाला निघण्यापूर्वी काही दिवस आधी सहल रद्द करणे अनिवार्य असते.

## प्रवासी विमा घेताय; या चुका टाळा

- **बारीक अक्षरातील मजकूर न वाचणे :** प्रवास विम्यातील सगळ्यात मोठी उणीव म्हणजे गोष्टी गृहीत धरल्या जाणे होय. सहलींचे नियोजन करताना आपण ट्रेकिंग, डायव्हिंग किंवा वाहन भाड्याने घेणे आदी गोष्टी ठरवतो. मात्र, या गोष्टी संरक्षित करण्याची तरतूद संबंधित प्रवासी विम्यात आहे की नाही, हे पाहणे तितकेच महत्त्वाचे आहे. अनेकदा या गोष्टींचा समावेश प्रवासी विम्याच्या कागदपत्रांमध्ये बारीक अक्षरात केलेला असतो.
- **पूर्वीचे आजार :** तुम्हाला आधीच जडलेले आजार जीवघेणे ठरत नाहीत, तोपर्यंत ते सहसा प्रवासी विम्यातून वगळले जातात.
- **साहसी खेळ :** अशाप्रकारच्या खेळांसाठी तुम्ही स्वतंत्र संरक्षण खरेदी करीत नाही, तोपर्यंत 'स्कुबा डायव्हिंग', 'स्कीइंग', 'ट्रेकिंग' आणि 'मोटरबायकिंग' आदी खेळांना संरक्षण दिले जात नाही.
- **अमली पदार्थांचे सेवन :** तुम्ही कोणत्याही अमली पदार्थाच्या प्रभावाखाली असाल, तर विम्याचे पैसे मिळण्याची अपेक्षा ठेवू नका.
- **युद्ध किंवा नागरी अशांतता :** अशा प्रकाराचा स्पष्ट उल्लेख नसेल, तोपर्यंत ते प्रवासी विम्यातून वगळले जाता. म्हणूनच हल्ली 'कॅन्सल फॉर एनी रिझन'सारखे संरक्षण लोकप्रिय होत आहे.

## महत्त्वाचे काय?

छोट्या वीकएंड ट्रिपसाठी तुम्ही प्रवासी विमा घेतला नाही, तरी चालेल. मात्र, तुम्ही घरापासून हजारो मैल लांब असता, विशेषतः दुसऱ्या देशात, तेव्हा हीच एक अशी गुंतवणूक असते जिचा तुम्हाला खरोखर आधार वाटू शकतो. क्रेडिट कार्ड असो की विमा कंपन्या, थोडीशी खबरदारी आणि नीट काळजी घेतली, की तुम्ही प्रवासासाठी सज्ज होता; नाही का?